# हॉटेल अॅण्ड रेस्टॉरण्ट असो.चे नाशिकला विभागीय अधिवेशन

नाशिक : हॉटेल अॅण्ड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया या संस्थेतर्फे दि. ७ ते ९ ऑक्टोबर या कालावधीत नाशिकमध्ये संस्थेचे १९ वे विभागीय अधिवेशन होणार आहे. या निमित्ताने पश्चिम विभागातील हॉस्पिटॅलिटी उद्योगातील अनेक नामवंत व्यावसायिक नाशिकमध्ये येणार आहेत. भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांच्या हस्ते हॉटेल रेडिसन ब्ल्यू येथे या अधिवेशनाचे उद्घाटन होणार आहे, अशी माहिती असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप शेट्टी यांनी दिली. सुमारे तीन वर्षांच्या खंडानंतर हे पश्चिम विभागीय अधिवेशन होत असून, या अधिवेशनात अनेक हॉटेल्स व रेस्टॉरंटचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी, गुंतवणूकदार आणि उद्योगातील दिग्गज सहभागी होणार असून, ते विविध विषयांवर विचारमंथन आणि संवाद करणार आहेत. या अधिवेशनामुळे नाशिकमधील वाइन पर्यटनासोबतच धार्मिक, कृषी, सांस्कृतिक, साहसी पर्यटन तसेच त्याच्याशी संबंधित अनेक सेवांना मोठ्या प्रमाणात चालना मिळेल, असेही प्रदीप शेट्टी म्हणाले.